नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १९० Issue - 190 | वार बुधवार दि. २७ नोव्हेंबर २०२४ Blow- Wednesday Date 27 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### पुन्हा कागदी मतपत्रिकेद्वारे मतदान नाही : सर्वोच्च न्यायालय

सोलापूर : ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ईव्हीएममध्ये छेडछाड केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत ही मागणी करण्यात आली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांची कानउघाडणी करत मागणी फेटाळून लावली. 'ते जिंकतात तेव्हा ईव्हीएम चांगले आणि पराभूत होतात, तेव्हा ईव्हीएममध्ये छेडछाड', असे कोर्टाने म्हटले. ईव्हीएम बंद करून पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी करणारी याचिका के.ए. पॉल यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि पी. बी. वराळे यांच्या खंठपीठासमोर सुनावणी झाली. चंद्राबाबू नायडू, वायएस जगन मोहन रेड्डीच्या विधानाच्या संदर्भात न्यायालय म्हणाले, यावेळी याचिककर्त्यांनी चंद्रबाबू नायडू आणि वायएस जगन मोहन रेड्डी यांनी ईव्हीएमबद्दल उपस्थित केलेल्या शंकाकडेही न्यायालयाचे लक्ष वेधले. त्यावर न्यायालय म्हणाले, जेव्हा चंद्राबाबू नायडू किंवा रेड्डी पराभूत होतात, तेव्हा ते म्हणतात ईव्हीएममध्ये छेडछाड केलीये. जेव्हा ते जिंकतात, तेव्हा ते काहीच म्हणत नाहीत. याकडे आपण कसे बघायचे?, असा सवाल करत न्यायालयाने याचिकाकर्त्यांची कानउघाडणी केली. काय होतंय की, जेव्हा तुम्ही जिंकता, तेव्हा ईव्हीएममध्ये छेडछाड नसते. पण, जेव्हा तुम्ही पराभूत होता, तेव्हा ईव्हीएमसोबत छेडछाड झालेली असते. जगापेक्षा तुम्हाला वेगळं का नकोय?, असा सवाल न्यायमूर्तींनी केला.

# संविधान धर्मनिरपेक्षच : सर्वोच्च न्यायालय

## उद्देशिकेतील शब्दांवर आक्षेप घेणाऱ्या याचिका निकाली; सर्वोच्च न्यायालयाची निरीक्षणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यघटनेच्या उद्देशिकेत 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'एकात्मता' या शब्दांच्या समावेशाला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळल्या. 'समाजवादी' हा शब्द डाव्या किंवा उजव्या आर्थिक धोरणांशी निगडित नसून तो कल्याणकारी प्रजासत्ताकाचे द्योतक असल्याचे न्यायालयाने निकालात नमूद केले.

१९७६मध्ये तत्कालीन इंदिरा गांधी सरकारने राज्यघटनेमध्ये ४२वी दुरुस्ती करून उद्देशिकेत या तीन संज्ञा जोडल्या होत्या. राज्यसभेचे माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी आणि वकील अश्विनी उपाध्याय यांनी उद्देशिकेतील 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' या दोन संज्ञांच्या समावेशाला आव्हान देणाऱ्या याचिका दाखल केल्या आहेत. त्यावर सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संजय कुमार यांच्या घटनापीठाने २२ नोव्हेंबर रोजी आपला निकाल राखीव ठेवला होता. या प्रकारची पहिली याचिका बलराम सिंह यांनी वकील विष्णू शंकर जैन यांच्यामार्फत २०२०मध्ये दाखल केली होती.



''या रिट याचिकांवर अधिक विचारविनिमय आणि निवाड्याची गरज नाही. राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार उद्देशिकेलाही लागू होतो'', असे न्या. खन्ना यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल जाहीर करताना स्पष्ट केले. इतक्या वर्षांनंतर ही प्रक्रिया शून्यवत करता येणार नाही असे या निकालातून स्पष्ट होते, असेही सरन्यायाधीशांनी सांगितले. राज्यघटना स्वीकारण्याच्या तारखेमुळे अनुच्छेद १३८अंतर्गत सरकारला असलेले अधिकार नाहीसे होत नाहीत आणि त्याला आव्हानही देता येणार नाही असे खंडपीठाने नमूद केले.

न्यायालयाने धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेचा उहापोह करताना शासनाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप म्हणजे काय हे स्पष्ट केले. व्यापक जनहिताच्या दृष्टीने विकासात आणि समानतेच्या अधिकारात अडथळा आणणाऱ्या धार्मिक प्रथा आणि दृष्टीकोन यामध्ये शासनाला हस्तक्षेप करण्यास धर्मनिरपेक्षता प्रतिबंध करत नाही असे खंडपीठाने सांगितले.

धर्मनिरपेक्षता हा शब्द सर्व धर्मांचा समान आदर करणारे प्रजासत्ताक गणराज्य दर्शवतो. तर समाजवाद या शब्दातून सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक अशा सर्व प्रकारच्या शोषणाचे उच्चाटन करण्याचा प्रजासत्ताकाचा निर्धार दिसतो-सर्वोच्च न्यायालय राज्यघटना किंवा उद्देशिका कोणत्याही विशिष्ट, डाव्या किंवा उजव्या, आर्थिक धोरण किंवा रचनेचा पुरस्कार करत नाही.

समाजवादाकडे शासनाची कल्याणकारी राज्याप्रति आणि संधीच्या समानतेप्रति कटिबद्धता या दृष्टीने पाहिले पाहिजे.

भारतीय चौकटीत त्यामध्ये आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा समावेश होतो.

आर्थिक किंवा सामाजिक परिस्थितीमुळे कोणताही नागरिक वंचित राहणार नाही याची शासन खबरदारी घेते.

समाजवाद खासगी उद्यामशीलतेवर तसेच अनुच्छेद १९(१)(ग) अंतर्गत मूलभूत अधिकार असलेल्या उद्योग व व्यापार करण्याच्या अधिकारावर निर्बंध आणत नाही.

१९७६मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेमुळे भारताचे वर्णन 'स्वायत्त, लोकशाही गणराज्य' याऐवजी 'स्वायत्त, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य' असे केले जाऊ लागले. आणीबाणीच्या काळात संसदेने घेतलेले सर्व निर्णय रद्दबातल ठरतात असे म्हणता येणार नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.



# मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीसच ?

## दिल्लीहून निरोप, एकनाथ शिंदे रुसल्याची चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमध्ये अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्री कोण, या प्रश्नाचे उत्तर अजूनही स्पष्ट होऊ शकलेले नाही. भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस हे संख्याबळाच्या जोरावर सहज मुख्यमंत्री होतील, असे वाटत असतानाच भाजपने 'आस्ते चलो'ची भूमिका घेतल्याने उत्कंठा वाढली आहे.

दुसऱ्या बाजूला एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक झाल्याने त्यांनाच पुन्हा संधी मिळावी, यासाठी त्यांचे समर्थक आग्रही आहेत. परंतु फडणवीसांच्या मुख्यमंत्रिपदावर दिल्लीत शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा असून तसा निरोप एकनाथ शिंदेंपर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे. त्यामुळे शिंदे नाराज असल्याचंही बोललं जातं. मुंबई पोलीस मुख्यालयातील शहीद स्मारकाला भेट देताना शिंदे-फडणवीस यांच्यातील टेन्शन देहबोलीतून जाणवत असल्याचं अनेक जण सांगतात. विधानसभेच्या सर्व जागांचे निकाल शनिवारी जाहीर झाले. निवडणूक आयोगाने रविवारी अधिकृतपणे राज्यपालांची भेट घेऊन नवनियुक्त आमदारांची यादीही सादर केली. त्यानंतर लगेचच नव्या मुख्यमंत्र्यांची निवड होणे अपेक्षित होते. त्यासाठी सर्वच पक्षांनी आपल्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांची निवड करण्याची औपचारिकता पूर्ण करणेही अपेक्षित होते.

त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसेना (उबाठा) यांनी आपल्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक घेऊन नेते निवडले. पण सर्वांत मोठा पक्ष असलेल्या भाजपने अजूनही आपल्या आमदारांची बैठक घेतलेली नाही. मंगळवारीही ही बैठक होण्याची शक्यता नसल्याने मुख्यमंत्रिपदाचा निर्णय त्यानंतरच होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

देवेंद्र फडणवीस सोमवारी दिल्लीला रवाना झाले असले, तरीही ते लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या कुटुंबातील विवाहाच्या स्वागत समारंभासाठी गेल्याचे समजते. या दौऱ्यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेऊन सरकार स्थापनेबाबत त्यांची चर्चा झाल्याची शक्यता धूसर आहे.

भाजपने आपल्या आमदारांना निवडून आल्यानंतर ल ग ` च च मुंबईत येण्याची घाई करू नका, असा निरोप पाठविल्याची माहिती अनेक आमदारांनी दिली. तरीही त्यातील अनेकांनी मुंबई गाठली असून देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यापैकी अनेक जणांनी माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत, अशी भावना जाहीरपणे व्यक्त केली. मात्र भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक कधी होणार, याबाबत कोणतीच स्पष्टता नसल्याने हा निर्णय लांबणीवर पडला आहे.

# 'मूल्यांची अंमलबजावणी महत्त्वाची'; संविधान दिन सोहळ्यामध्ये मुर्मू यांच्याकडून प्रथम राष्ट्रपतींच्या मार्गदर्शनाचे स्मरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संविधानातील मूल्यांची अंमलबजावणी कशी केली जाते त्यावर संविधानाचे यश अवलंबून असेल असे संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी म्हटले होते, अशी आठवण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी संविधान दिनानिमित्त संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात झालेल्या विशेष कार्यक्रमात करून दिली.

देशाने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले, या ऐतिहासिक घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मंगळवारी राष्ट्रपती मुर्मू यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांना उद्देशून केलेल्या भाषणात संविधानाचे महत्त्व विशद केले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासह मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संविधानसभेचे सल्लागार



व संविधानाचा म सुदा तयार करणारे बी. एन. राव तसेच, संविधान सभेतील १५ महिला सदस्य व संविधानाच्या निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये सहभागी झालेले इतर अधिकारी या सर्वांचे त्यांच्या योगदानाबद्दल मुर्मूंनी आभार मानले.

संविधान हा आपल्या देशाचा पवित्र ग्रंथ असून आज आपण सर्वजण या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार झालो आहोत. ७५ वर्षांपूर्वी याच दिवशी संविधान सभेने त्यावेळी नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशासाठी संविधान तयार करण्याचे मोठे कार्य पूर्ण केले. आपले संविधान आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक स्वाभिमानाचे प्रतिक आहे, असे मुर्मू म्हणाल्या. या विशेष कार्यक्रमामध्ये ७५ रुपयांचे विशेष नाणे व टपाल तिकीट प्रसिद्ध करण्यात आले. संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली आवृत्तीचेही प्रकाशन मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला, विरोधीपक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे उपस्थित होते.

# पराभवानंतरच ईव्हीएमच्या तक्रारी! मतपत्रिका वापराची मागणी फेटाळली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : निवडणुकीत पराभव झाल्यानंतरच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये (ईव्हीएम) छेड़छाडीचा मुद्दा उपस्थित केला जातो असे कठोर निरीक्षण नोंदवत, सर्वोच्च न्यायालयाने देशातील निवडणुकांसाठी मतपत्रिकांचा वापर करण्याची मागणी करणारी याचिका मंगळवारी फेटाळून लावली. के ए पॉल या नागरिकाने दाखल केलेली याचिका फेटाळताना, ''जेव्हा तुम्ही निवडणूक जिंकता तेव्हा ईव्हीएममध्ये छेड़छाड झालेली नसते. तुमचा पराभव होतो तेव्हा त्यामध्ये छेडछाड झालेली असते,'' अशी टिप्पणी न्या. विक्रम नाथ आणि न्या. पी बी वराळे यांच्या खंडपीठाने केली.



मतदारांना आकर्षित करण्यासाठी पैसे, मद्या आणि इतर वस्तूंचे वाटप केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांवर किमान पाच वर्षांसाठी अपात्र ठरवण्यासंबंधी निवडणूक आयोगाला निर्देश द्यावेत अशीही मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. त्यावर, ''इतक्या चमकदार कल्पना तुम्हाला कशा सुचल्या,'' असा प्रश्न खंडपीठाने विचारला. आपण एका संस्थेचे अध्यक्ष असून या संस्थेने तीन लाख अनाथ आणि ४० लाख विधवांची सुटका केली आहे असे याचिकाकर्त्यांनी सांगितले. त्यावर तुम्ही या राजकीय क्षेत्रात का पडता? तुमच्या कामाचे क्षेत्र अगदी भिन्न आहे असे खंडपीठाने त्यांना सांगितले.

लोकसभा निवडणुकीनंतर, निवडणूक आयोगाने जून २०२४मध्ये जाहीर केल्यानुसार नऊ हजार कोटी रुपयांची रोकड जप्त केल्याची माहिती दिली होती असे पॉल यांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर, मतपत्रिकांचा वापर केल्यामुळे भ्रष्टाचार होणार नाही का असा उलट प्रश्न न्यायालयाने विचारला.

टेस्लाचे संस्थापक एलॉन मस्क, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वाय एस जगन मोहन रेड्डी यांनीही यापूर्वी ईव्हीएम वर शंका व्यक्त केल्या होत्या असे पॉल म्हणाले. मात्र न्यायालयाने हा मुद्दा विचारात घेण्यास नकार दिला. यापूर्वी एप्रिलमध्येही मतदान मतपत्रिकेवर घ्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या होत्या. मतदान यंत्रामध्ये फेरफार करण्याच्या शंका निराधार असल्याचे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते.

निवडणुकांदरम्यान पैसे वाटण्यात आले हे प्रत्येकाला माहीत आहे असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी सुनावणीदरम्यान केला. त्यावर, ''आम्हाला कोणत्याही निवडणुकांसाठी कधीही पैसे मिळाले नाहीत,'' असे उद्गार खंडपीठाने काढले.

चंद्राबाबू नायडू किंवा जगन मोहन रेड्डी हरले तेव्हा ते म्हणाले ईव्हीएममध्ये छेडछाड होऊ शकते. जेव्हा ते जिंकले तेव्हा ते काहीही बोलले नाहीत. आम्ही याकडे कसे पाहायचे? आम्ही हे अमान्य करतो. तुम्ही हा युक्तिवाद करण्याची ही जागा नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे.

## थंडीला पोषक असणारी हवामानाची स्थिती

हवामान खात्याचा अंदाज

# नगरमध्ये पारा ९.२ अंशांवर; पुढील तीन महिने चांगल्या थंडीचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बंगालच्या उपसागरात चक्रीवादळे तयार होण्याचा अति उच्च काळ संपला आहे. प्रशांत महासागरात ला - निना सक्रीय होण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर महिन्यात हिमालय आणि हिमालयाच्या रांगामध्ये अपेक्षित बर्फवृष्टी झाली आहे.

थंडीसाठी पोषक स्थिती निर्माण झाल्यामुळे डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याच्या अखेरपर्यंत चांगली थंडी पडण्याचा अंदाज आहे.

साधारपणे १५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर हा बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ तयार होण्याचा अति उच्च काळ असतो. डिसेंबरमध्ये चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे उपसागरातून देशाच्या भूमीवर बाष्पयुक्त वारे येऊन थंडी कमी होण्याची फारशी शक्यता नाही. दुसरीकडे नोव्हेंबर महिन्यात अपेक्षित प्रमाणात पश्चिमी विक्षोप (थंड हवेचे झोत) हिमालय आणि हिमालयाच्या रांगामध्ये सक्रीय राहिले. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये हिमालयीन रांगात चांगली बर्फवृष्टी झाली आहे. तसेच प्रशांत महासागरात ला - निना सक्रीय होण्याची शक्यता आहे. ला - निना सक्रीय असेल तर जानेवारी महिन्यात हिमालयीन भागात पश्चिम विक्षोप जास्त प्रमाणात येऊन उत्तर भारतात थंडीच्या लाटा जास्त येतात. त्याखालोखाल डिसेंबर आणि फेब्रुवारी महिन्यात थंडीच्या लाटा येतात. एकूण स्थिती डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याच्या अखेरपर्यंत देशात चांगली थंडी पडण्याचा अंदाज आहे.



हिमालयीन भागात म्हणजे जम्मू काश्मीर, लेह - लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड तसेच सिक्कीम या भागात समुद्रसपाटीपासून साडेबारा किलोमीटर उंचीवरून सातत्याने पश्चिमी विक्षोप (थंड वाऱ्याचे झोत) येत आहेत. या वाऱ्याचा वेग ताशी २७५ किलोमीटर इतका आहे. रशिया, मध्य आशियातून गतीने येणाऱ्या या थंड वाऱ्यांमुळे राज्यात चांगली थंडी पडली आहे. एक डिसेंबरपर्यंत अशीच स्थिती कायम राहण्याची आणि थंडीत किरकोळ वाढ होण्याची शक्यता आहे.

राज्यात थंडी कायम असून, मंगळवारी (२६ नोव्हेंबर) नगरमध्ये राज्यात सर्वांत कमी ९.७ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. यंदाच्या हंगामात राज्यात पारा एका अंकावर घसरण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्या खालोखाल पुण्यात १०.८, जळगावात ११.०, सातारा १२.९, औरंगाबादेत १२.१, परभणीत १२.०, नागपुरात १२.० आणि गोंदियात १२.२, सातांक्रुजमध्ये १६.८ आणि अलिबागमध्ये १६.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे.ला - निना सक्रीय असेल, त्या वर्षी थंडीच्या लाटा जास्त येतात. डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारीत हिमालयीन भागांत चांगली बर्फवृष्टी होऊन उत्तर भारतासह महाराष्ट्रापर्यंत चांगली थंडी पडण्याचा अंदाज आहे. प्रामुख्याने राज्यात यंदा फेब्रुवारीअखेरपर्यंत चांगली थंडी पडण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

## संपादकीय....

### न्यायालयाने फटकारले

निवडणुकीत पराभव झाल्यानंतरच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये (ईव्हीएम) छेड़छाडीचा मुद्दा उपस्थित केला जातो असे कठोर निरीक्षण नोंदवत, सर्वोच्च न्यायालयाने देशातील निवडणुकांसाठी मतपत्रिकांचा वापर करण्याची मागणी करणारी याचिका मंगळवारी फेटाळून लावली. के ए पॉल या नागरिकाने दाखल केलेली याचिका फेटाळताना, ''जेव्हा तुम्ही निवडणूक जिंकता तेव्हा ईव्हीएममध्ये छेड़छाड झालेली नसते. तुमचा पराभव होतो तेव्हा त्यामध्ये छेडछाड झालेली असते,'' अशी टिप्पणी न्या. विक्रम नाथ आणि न्या. पी बी वराळे यांच्या खंडपीठाने केली. मतदारांना आकर्षित करण्यासाठी पैसे, मद्या आणि इतर वस्तूंचे वाटप केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांवर किमान पाच वर्षांसाठी अपात्र ठरवण्यासंबंधी निवडणूक आयोगाला निर्देश द्यावेत अशीही मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. त्यावर, ''इतक्या चमकदार कल्पना तुम्हाला कशा सुचल्या,'' असा प्रश्न खंडपीठाने विचारला. आपण एका संस्थेचे अध्यक्ष असून या संस्थेने तीन लाख अनाथ आणि ४० लाख विधवांची सुटका केली आहे असे याचिकाकर्त्यांनी सांगितले. त्यावर तुम्ही या राजकीय क्षेत्रात का पडता? तुमच्या कामाचे क्षेत्र अगदी भिन्न आहे असे खंडपीठाने त्यांना सांगितले. लोकसभा निवडणुकीनंतर, निवडणूक आयोगाने जून २०२४मध्ये जाहीर केल्यानुसार नऊ हजार कोटी रुपयांची रोकड जप्त केल्याची माहिती दिली होती असे पॉल यांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर, मतपत्रिकांचा वापर केल्यामुळे भ्रष्टाचार होणार नाही का असा उलट प्रश्न न्यायालयाने विचारला. टेस्लाचे संस्थापक एलॉन मस्क, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वाय एस जगन मोहन रेड्डी यांनीही यापूर्वी ईव्हीएमवर शंका व्यक्त केल्या होत्या असे पॉल म्हणाले. मात्र न्यायालयाने हा मुद्दा विचारात घेण्यास नकार दिला. यापूर्वी एप्रिलमध्येही मतदान मतपत्रिकेवर घ्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या होत्या. मतदान यंत्रामध्ये फेरफार करण्याच्या शंका निराधार असल्याचे न्यायालयाने तेव्हा म्हटले होते. निवडणुकांदरम्यान पैसे वाटण्यात आले हे प्रत्येकाला माहीत आहे असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी सुनावणीदरम्यान केला. त्यावर, ''आम्हाला कोणत्याही निवडणुकांसाठी कधीही पैसे मिळाले नाहीत,'' असे उद्गार खंडपीठाने काढले. चंद्राबाबू नायडू किंवा जगन मोहन रेड्डी हरले तेव्हा ते म्हणाले ईव्हीएममध्ये छेडछाड होऊ शकते. जेव्हा ते जिंकले तेव्हा ते काहीही बोलले नाहीत. आम्ही याकडे कसे पाहायचे? आम्ही हे अमान्य करतो. तुम्ही हा युक्तिवाद करण्याची ही जागा नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे.

# बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## ७५ वी हिरक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर घम्म सेवा संघ बौद्ध विहार, जय भवानी नगर, सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर २०२४ ला जय भवानी नगर येथील धम्म सेवा संघ बौद्ध विहारात ७५ व्या हिरक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेचे उद्घाटन करताना माजी शिक्षणाधिकारी डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर म्हणाले की, सदाचरणाने वागणा-यांचा समाजात लोक सन्मान करतात. म्हणून सदाचरण समजून घेण्यासाठी दर रविवारी बौद्धांनी बुद्ध विहारात गेले पाहिजे. ज्यामुळे प्रेरणा मिळते. तथागत अमर्याद ज्ञानाचे धनी होते.

याप्रसंगी किशोर हिरामण पाटील म्हणाले की, मला बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक साहित्य माहीत पडल्याने आज मी बुद्ध विहारात पहिल्यांदा आलो, ज्यामुळे पुनर्जन्म झाल्यासारखे वाटत आहे. रामदास वाघमारे म्हणाले की, विहार व्यवस्थापनाने वर्तनातून सिद्ध करावे की, इतरांनी विहारात का आले पाहिजे? जगात २७ बौद्ध राष्ट्रे आहेत. ताराचंद गायकवाड म्हणाले की, बुद्ध विहार हे धम्म चळवळीचे केंद्र आहे. येथे बालपणापासून मुलांवर संस्कार केले पाहिजेत. अर्जुन चव्हाण म्हणाले की, भूतान सारख्या देशात चौकाचौकात पोलीस पहायला मिळत नाही कारण त्या बौद्ध राष्ट्रात धम्माचे पालन होत असल्याने गुन्हेगारी नगण्य प्रमाणात आहे.

प्रमुख वक्ते श्रावण गायकवाड म्हणाले की, बौद्धांनी २२ प्रतिज्ञांचे पालन केले पाहिजे. पंचशील त्रिशरणानंतर प्रत्येक रविवारी चर्चा सत्राचे आयोजन केले पाहिजे. जगात एकच बुद्ध आहे, ते म्हणजे तथागत बुद्ध होय. तर एकच बोधिसत्व आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. आपण मूळ नागवंशीय लोक आहोत.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दक्षिण भारतातील द्रविड व उत्तर भारतातील नाग लोक हे नागवंशीय लोक आहेत. म्हणून त्यांना संघटीत करण्यासाठी आम्ही दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) हे राष्ट्रीय संघटन चालवीत आहोत. विहारात वक्ते, स्पर्धक, वादविवादपटू निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यशाळेचे आयोजन केले पाहिजे, ज्यातून नवीन पिढी घडेल. बालसंस्कार केंद्रे चालवून बालमनावर संस्कार केले पाहिजेत. यासाठी सत्येंद्र तेलतुंबडे यांनी लाफिंग बुद्धा अंतर्गत प्ले ग्रुप व नर्सरी सुरू करायचे आव्हान केले आहे. ज्यात आपण सहभाग घ्यावा. २४ नोव्हेंबर १९५६ ला काशी विद्यापीठात मार्गदर्शन करताना 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्याच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्म सत्य आहे तर मग पंचज्ञानेंदियाद्वारे मिळालेले व विज्ञानाने शोधलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न विचारून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारून सत्याकडे वळण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आज रोजी दिवसभर सभा, संमेलन, बैठकीत मार्गदर्शन केले होते. त्यात २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे असा आदेशयुक्त संदेश दिला होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावलावर पाऊल ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलने आज रोजी सकाळ, दुपार व संध्याकाळी अशा तीन सत्रात शहराच्या सिडको, हडको व साकेत नगरात वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळांचे आयोजन केले आहे. २५ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्त्वानुसार जोडणा-या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. म्हणून समाजात समता स्थापित करण्यासाठी अंमलबजावणी व्हावी म्हणून उपाय योजना क्रियान्वित करणे आवश्यक आहे. करिता प्रत्येक बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की त्यांनी केवळ दर रविवारीच नव्हे! तर दररोज बुद्ध विहारात जाऊन चर्चेत सहभागी होण्याची नितांत आवश्यकता आहे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके, सूत्रसंचालन गौतम पारखे यांनी केले. यावेळी श्रावण गायकवाड यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे उपस्थितांना वाटप केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, रावसाहेब सोनकांबळे, रमेश जोगदंडे, रजनीकांत दिवेकर, अर्जुन चव्हाण, व्ही. बी. गायकवाड, टी. एन. सोनवणे, निर्मला सोनवणे, मधुकर लांडगे, रामदास वाघमारे, मनोज घोडेराव, सिद्धार्थ बनकर, गोविंद वाहूळ, ए. एस. जवंजाळ, इंजिनिअर किशोर पाटील, श्रावण गायकवाड, सुनिता बनकर, मंगला साळवे, कविता डोंगरे, सीमा साळवे, लक्ष्मी गायकवाड, विमल भुजंग, कमल पारखे, अशोक सुरडकर, दत्तू सोनवणे, नेहा आठवले, नामदेव वाकडे, संविधान वाकळे, पुरभाजी पंडित इत्यादी शेकडो उपासक उपस्थित होते. अशाप्रकारे संजय जी केदार यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## बार्टी आणि समाजकल्याण आयुक्तालय आयोजित संविधान रॅलीत हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ७५ व्या संविधान दिनानिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन संविधान दिन साजरा करण्यात आला.

पुणे कॅम्प येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास डॉ सुहास दिवसे, जिल्हाधिकारी, पुणे , बार्टी संस्थेच्या निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त श्री विशाल लोंढे, जिल्हा परिषद समाजकल्याण अधिकारी श्री देवाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

बार्टी आयोजित संविधान रॅलीचे उद्धघाटन पुणे जिल्हाधिकारी डॉ सुहास दिवसे व मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. या रॅलीत शासकीय सफाई कामगारांच्या मुला मुलींची निवासी शाळा, येरवडा, पुणे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील वस्तीगृहातील विद्यार्थी , बार्टी ग्रंथालयातील विद्यार्थी अधिकारी व कर्मचारी नागरिक महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांनी महापुरुषांची वेशभूषा परिधान करून रॅलीचे लक्ष वेधून घेतले. तसेच विद्यार्थ्यांनी संविधानाचा सन्मान हाच आमचा अभिमान संविधानाचा विजय , डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विजय अशा घोषणा देऊन संविधानाचा जागर केला. रॅली जिल्हा परिषद- सामाजकल्यान आयुक्त कार्यालय - जिल्हाधिकारी कार्यालय मार्गे डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त श्री विशाल लोंढे यांनी राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे सामुहिकपणे वाचन केले .

याप्रसंगी श्रीमती इंदिरा अस्वार, स्नेहल भोसले व विद्यार्थ्यांनी संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या .

बार्टी मुख्यालयातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभाग प्रमुख श्रीमती स्नेहल भोसले यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.यावेळी विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, अनिल कारंडे, उमेश सोनवणे , शुभांगी पाटील आदी उपस्थित होते.

बार्टी संस्थेच्या वतीने नागरिकांना राज्यघटनेच्या उद्देशिकेचे मोफत वितरण करण्यात आले.

## भारतीय संविधानाला अडीच हजार वर्षांपूर्वीचा विचार, तत्व, मूल्य वारसा : प्रा. शरद शेजवळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



येवला/प्रतिनीधी : भारतीय संविधानाने स्वीकारलेले लोकशाही समता स्वातंत्र्य न्याय बंधुता धर्मनिरपेक्षता एकता एकात्मता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हे तत्व विचार भारत भूमीतल्या महान अशा वैचारिक प्राथमिक प्राकृतिक विचाराचे धोतक असून भारतीय संविधानाने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारले व अंगीकारले मानवी जीवन मूल्य अडीज हजार वर्षांपूर्वीचा विचार,तत्व,मूल्य वारसा असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय संविधान संवर्धन समितीचे मुख्य प्रवर्तक तथा निमंत्रक प्रा.शरद शेजवळ यांनी केले.

**महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाचा संविधान दिन साजरा**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहात आयोजित भारतीय संविधानाने देशाला काय दिले या विषयावर आयोजित उद्बोधन पर व्याख्यानात प्रा शेजवळ बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी मुलांच्या वस्तीगृहाचे अधीक्षक विक्रम कुकडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. राजरत्न वाहुळ,मुलींच्या वसतिगृहाच्या अधिक्षक सुशीला पेढेकर हे उपस्थित होते.

भारतीयसंविधानाने भारतातील सर्व सामान्य नागरिकापासून ते उच्चपदस्थ व्यक्ती ला सुद्धा समान हक्क अधिकार वाहन केले असून भारताला महानतम लोकशाही शासन व्यवस्था बहाल केली असून भारतीय नागरिकांनी संविधान वाचावे तरच हा देश वाचेल असे प्रतिपादन यावेळी बोलताना पराग शरद शेजवळ यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन वसतिगृहाचे कनिष्ठ लिपिक हिरामण मेश्राम यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हर्षा रोहम,लक्ष्मण दळवी,वंदना भोये, निलम केदार,पायल बोरसे, साधना साबळे, रिया झोले, योगिता चौधरी, दीपिका वसावे, सेजल गावित, कल्पना वसावे, पायल आंबेकर, दिपाली पवार, उषा महाले,निकिता सहारे, सानिया भवरे,रवींद्र जाधव, संगीता दहाडे, कल्पेश अहिरे,उमाकांत थोटवे,राजेश चौरे,सुनील वसावे अजित धिंडा सारिका बरफ, दीपाली जाधव यांनी परिश्रम घेतले.आभार सुशीला पेढेकर यांनी मानले. कार्यक्रमास आदिवासी मुलांच्या व मुलींच्या वस्तीगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोहा येथे संविधान अमृत महोत्सव साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : जगातील सर्वात मोठी लिखित अशी राज्यघटना तथा भारतीय संविधान अमृत महोत्सव निमित्त आज लोहा शहरातील क्रांतीसुर्य बुद्ध विहार येथे साजरा करण्यात आला. सर्वप्रथम तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर त्रिशरण व पंचशील,बुद्ध पूजा पाठ भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा लोहा अध्यक्ष माननीय बापूसाहेब कापुरे सर यांच्या वतीने घेण्यात आला याप्रसंगी लोहा नगरीच्या माजी नगराध्यक्ष आदरणीय त्रिशलाबाई कांबळे तसेच भारतीय बौद्ध महासभेचे माजी अध्यक्ष व्हि. के.कांबळे सर,ई.जे.बनसोडे सर उपा.देविदास महाबळे उपा.मिलिंद महाबळे,उपा.लक्ष्मण महाबळे,उपा. केशव एडके,मानवी हक्क अभियान माजी तालुकाध्यक्ष तुकाराम दाढेल,पत्रकार सुलतान शेख,उपा. राजाभाऊ बनसोडे सर,रत्नाकर महाबळे उपा.धोंडिबा यानभुरे केंद्रीय शिक्षक तथा सरचिटणीस भारतीय बौद्ध महासभा शाखा लोहा,समता सैनिक दल संरक्षण उपाध्यक्ष सुभाष खाडे,संस्कार सचिव शरद कापुरे सह आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धोंडीबा यानभुरे यांनी केले आभार भारतीय बौद्ध महासभा शाखा लोहा अध्यक्ष माननीय बापूसाहेब कापुरे यांनी मानले



## भिमशाहीर नागनाथ दुपारगुडे यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /एस.के.गायकवाड) : आपल्या पहाडी आणि दमदार आवाजात आयुष्यभर भिमगित गाण्याच्या माध्यमातून बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर आदी महामानवांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करित समाज प्रबोधन करणारे सराटी ता.तुळजापूर येथील अष्टपैलू कलावंत भिमशाहीर नागनाथ नामदेव दुपारगुडे यांचे दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे १.३० वा.दरम्यान अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.

दिवंगत शाहीर नागनाथ दुपारगुडे यांचे वडील कालकथीत संत नामदेव दुपारगुडे हे वारकरी संप्रदायाचा वारसा जोपासणारे कीर्तनकार होते.नामदेव महाराज सराटीकर म्हणुन ते सर्वत्र ओळखले जात होते. त्यांच्यामुळेच नागनाथ दुपारगुडे यांना गायण आणि वादणाची आवड निर्माण झाली होती.लहाणपणा पासूनचं नागनाथ दुपारगुडे हे आंबेडकरी चळवळीसी जोडले गेले होते. एक उत्कृष्ट हार्मोनियम वादक म्हणून ही त्यांची ओळख होती.कवी गायक लेखक प्रबोधनकार भिमशाहीर दिवंगत बाळशिवबा गुरुजी सोलापूर यांचे ते अत्यंत निकटवर्तीय चहाते होते. सोलापूर येथील कलावंत समितीचे ते संस्थापक विश्वस्त होते.वडीला पासुनच कलेचा वारसा लाभलेले नागनाथ दुपारगुडे यांनी भारूड गीते गायणाचाही छंद जोपासला होता.

जेमतेम माध्यमिक शिक्षण पूर्ण करून आपला शेती व्यवसाय सांभाळत आयुष्यभर आंबेडकरी चळवळीत भिमशाहीर म्हणून आपल्या पहाडी आणि दमदार आवाजात समाज प्रबोधन करणारे, नागनाथ दुपारगुडे यांनी भिमशाहीर, प्रबोधनकार, भारूडकार, हार्मोनियम वादक, बुद्ध फुले शाहू आंबेडकर चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून आपली ओळख निर्माण केली होती.

एक अष्टपैलू कलावंत नागनाथ नामदेव दुपारगुडे यांचे दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे १.३० वा.दरम्यान वयाच्या ६० व्या वर्षी अल्पशा आजाराने सराटी येथे राहत्या घरी दु:खद निधन झाले.त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीत कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना समाजातल्या सर्व स्तरातून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत मारहाण; पतीसह सासरच्या मंडळींवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नी सासरी नांदत असताना तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच पत्नी कामावर गेल्यानंतर तिच्यावर पाळत ठेवून त्रास देत संशय घेऊन लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची फिर्याद लक्ष्मी गंगाराम गायकवाड (वय-२४,रा.सुशील मराठी विद्यालय समोर,लिमयेवाडी) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती गंगाराम, सासू पार्वती, दीर राजू, नणंद पुष्पा जाधव व चुलत दिर भीमा गायकवाड (सर्व.रा.संगमेश्वर नगर,अक्कलकोट रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कुंभार हे करीत आहे.

### आरकाल गार्डन जवळून सायकल पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : पद्मा नगर येथील आरकाल गार्डन शेजारी पार्क करून ठेवलेली सहा हजार पाचशे रुपये किमतीची स्टेन्थ कंपनीचे डिस्क ब्रेक असलेली सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीन ते पाच वाजण्याच्या दरम्यान घडली. या प्रकरणी समर्थ पांडुरंग मगर (वय-१८-,रा.हगलूर) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास हवालदार उबाळे हे करीत आहेत. व तसेच दुसऱ्या घटणेत फिर्यादी दयानंद सातलिंगप्पा कलशेट्टी (वय-४६,रा. गंगाधर नगर,अक्कलकोट रोड) यांची देखील सहा हजार रुपये किमतीची सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. त्यांनी देखील पद्मानगर येथे त्यांची सायकल पार्क करून ठेवलेली होती. पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

### अध्यापक अपार्टमेंट मधून सोन्या-चांदीचे दागिने पळवले

सोलापूर, (प्रतिनिधी) : शुक्रवार पेठ येथील अध्यापक अपार्टमेंट मधील प्लॉट नंबर दोन दुसरा मजला येथील फिर्यादी सुजित किरण फडकुले यांच्या घरातून १ लाख ८१ हजार २०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना १९ ते २९ ऑक्टोंबर दरम्यान घडली. याप्रकरणी सुजित फडकुले यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी कडून घराची चावी हरवलेली होती.त्या चावीच्या साह्याने फिर्यादी हे घरात नसताना अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप उघडून घरात प्रवेश करत घरातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.

# साद फाऊंडेशनची संविधान सन्मान दौड वालचंदनगरमध्ये प्रचंड उत्साहात संपन्न

## विजेत्या धावपटूंना रोख बक्षिसे, प्रमाणपत्रे वितरित, तरुणाईमध्ये उत्साह शिगेला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर/प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वालचंदनगर येथे साद फाऊंडेशन इंदापूर या चॅरिटेबल ट्रस्ट (एनजीओ)च्या वतीने संविधान सन्मान दौड मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ ते १०:३० या वेळेत संपन्न झाली.

प्रमुख अतिथी म्हणुन वालचंदनगर पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक निरीक्षक टेळकीकर साहेब, भारत चिल्ड्रन्स ॲकॅडमी चे प्रिन्सिपल कृष्णदेव रामराव क्षीरसागर सर, श्री वर्धमान विद्यालय वालचंदनगर चे प्राचार्य कुंभार सर, वालचंद विद्यालय कळंब चे प्राचार्य अर्जुन सर, पवार सर, ठोंबरे सर, लासुर्णे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रज्ञा लोंढे, विश्वासराव रणसिंग महाविद्यालयाचे डांगे सर, वर्धमान विद्यालयाचे उपप्राचार्य निकम सर, बीसीए चे अमोल गोडसे सर, श्रीमती आशा रणवरे मॅडम, रणसिंग कॉलेज च्या बनसोडे मॅडम, कपिल कांबळे सर, श्री डॉ. पाखरे सर, वालचंदनगर पोलीस स्टेशन चे प्रमोद बनसोडे, तसेच अनेक शाळांचे शिक्षक उपस्थित होते.






प्रचंड उत्साहात झालेली ही स्पर्धा चार गटांत झाली.

**१७ वर्षांवरील मुलांच्या गटात** - १) प्रतिक महेश घोरपडे २) शाहिद ताजुउद्दीन मुलाणी ३) सुरज सतीश तुपे यांनी क्रमांक पटकावले तसेच **१७ वर्षांखालील गटात** - १) यश प्रसाद कुलकर्णी २) शंकर दत्तु यादव ३)आर्चित अमोल कडुदेशमुख या मुलांनी क्रमांक पटकावले.त्याचप्रमाणे

**१७ वर्षांवरील मुलींच्या गटात** - १) कु. दिक्षा सोमनाथ लोहार २) कु. तपस्या राजेंद्र फरतडे ३) कु. चैतन्या संतोष गायकवाड यांनी बक्षिसे मिळवली तर **१७ वर्षांखालील मुलींच्या गटात** - १) शर्वरी सचिन सावंत २) अंजली महेशकुमार लावंड ३) अंकीता अनिल वाघेला यांनी क्रमांक पटकावले.

उत्कृष्ट नियोजन, चोख बंदोबस्त, प्राथमिक आरोग्य केंद्र लासुर्णे यांची तत्पर सेवा, अनेक शाळेच्या शिक्षकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमाविषयी प्रचंड आवड या वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेच्या सुरवातीला संविधान निर्माते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व मान्यवरांच्या हस्ते करून सुरवात झाली. मान्यवरांच्या हस्ते संविधान पुस्तकिचे पुजन व दिपप्रज्वलन केले. तसेच यावेळी राष्ट्रगीत झाले व नंतर टेळकीकर साहेबांनी उद्देशिका वाचन करून सगळ्यांना ग्रहीत केले .

एकुण ९ विद्यालय, महाविद्यालय यांमधील ३५० धावपटुंनी सहभाग घेतला. यावेळी मुलामुलींच्या मोठ्या १७ वर्षांवरील गटातील विजेत्या धावपटुंना प्रथम क्रमांकास प्रत्येकी रोख २५०० व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकांस प्रत्येकी रोख २००० व प्रमाणपत्र तसेच तृतीय क्रमांकास रोख १५०० व प्रमाणपत्र देण्यात आले...तर १७ वर्षांच्या खालील मुलामुलींच्या गटातील धावपटुंना प्रथम बक्षीसासाठी रोख २००० रू व प्रमाणपत्र, दुसऱ्या क्रमांकास प्रत्येकी १५०० व प्रमाणपत्र तसेच तृतीय क्रमांकास प्रत्येकी १००० व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच सहभागी होणाऱ्या प्रत्येक धावपटुस सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुरज वनसाळे, संचालक आप्पासाहेब कदम, सौरभ धनवडे, यश मोरे, सतीश वाघमारे, बबलू वंचाळे, क्षितीज वनसाळे, स्वयंसेवक, कर्मचारी, सचिव यांनी मेहनत घेतली. आणि वालचंदनगर पंचक्रोशीतील शेकडो नागरिकांनी या स्पर्धेचा आनंद लुटला.

# अनंत चैतन्य माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे संविधान दिवस उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर/प्रतिनिधी : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अथक प्रयत्नाने म्हणजे दोन वर्षे ११ महिने १८ दिवसाच्या कालावधीनंतर एक सर्वसमावेशक अशा प्रकारचे जगातील सर्वात मोठे असे लिखित स्वरूपातील भारताच्या सर्वोच्च कायद्याचे पुस्तक ज्याला भारताचे संविधान, भारतीय राज्यघटना असे संबोधले जाते ज्याद्वारे मुलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती,अधिकार, आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये आणि मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट मांडतो . या भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना देशाला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक म्हणून घोषित करण्यासोबतच सर्व नागरिकांसाठी न्याय, स्वातंत्र्य व समानता सुरक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवते , बंधुत्वाची हमी देते व राष्ट्रीय एकात्मता अधोरेखित करते म्हणूनच मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या सन्मानार्थ व संविधानातील मुलभूत तरतूदीविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.हे लक्षात घेऊन आजरोजी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे संविधान दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान प्रास्ताविक फलकाचे पुजन करण्यात आले. यानंतर इ. १० वी ची विद्यार्थिनी कु. लक्ष्मी हलकंबे हिच्या समवेत सर्व विद्यार्थ्यांनी संविधान प्रास्ताविकाचे वाचन केले. यावेळी प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री. शहाजी माने यांनी संविधान दिन व महत्व याविषयी मार्गदर्शन केले. तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे,शशी अंकलगे, सुरेश जाधव, अब्दुल अझीझ मुल्ला,सरदार मत्तेखाने, प्रा. रविंद्र कालीबत्ते, काशीनाथ पाटील, रमेश शिंदे, राजेंद्र यंदे,शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी, मल्लम्मा चप्पळगाव, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष व पुर्ननिर्वाचित आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक आदरणीय श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सन्माननीय श्री. सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी प्रशालेतील या कार्यक्रमाचे कौतुक केले.



# मैंदर्गी जिल्हा परिषद कन्नड मुली शाळेत संविधान दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद कन्नड मुली शाळा मैंदर्गी येथे संविधान दिन साजरा करण्यात आली. यावेळी संविधानाचे प्रतिमेस पूजन करून वाचन करण्यात आले. व तसेच २६/ ११ मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल व ताजमहल हॉटेल आणि हॉटेल ओबेराय या ठिकाणी दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले अशोक कामटे, हेमंत करकरे, विजय साळस्कर यांचे प्रतिमेला पुष्पहार घालून वर्गातील मुलीने मेणबत्ती लावून अभिवादन केले. मुलींनी संविधान दिनाबद्दल मनोगत व्यक्त केले आणि शहीद पोलीस अधिकारी यांचे बद्दल मनोगत व्यक्त केले यासंदर्भात शाळेतील इतर शिक्षक बंधू आणि भगिनी संविधान दिनाबद्दल मुलींना मार्गदर्शन केले.

यावेळी मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी, विजयकुमार गुंडद, सुरेखा मसुती, सुप्रिया बिराजदार, विजयालक्ष्मी भैरामडगी, भौरम्मा पोमाजी, विजया नाडगौडा, अश्विनी पाटील, रमेश जुजगार, गुरुपाद शिवणगी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षक बंधू आणि भगिनी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित सर्व पालक यांनी हुतात्म्यांचा व संविधान प्रतिमेला नतमस्तक होऊन अभिवादन केले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण**

**सामूहिक संविधान प्रास्ताविकेचे वाचन**

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्ष सोलापूर शहराच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिक संविधान प्रास्ताविकेचे वाचन लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

प्रसंगी मा.राजाभाऊ सरवदे साहेब बोलतेवेळी २६ नोव्हेंबर १९४९ आणि २६ जानेवारी १९५०,भारतीय संविधानाच्या इतिहासातील ह्या दोन महत्त्वाच्या तारखा आहेत.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधानाचा स्वीकार केला होता तर २६ जानेवारी १९५० रोजी लागू करण्यात आले.संविधान ज्या दिवशी स्वीकारलं त्या तारखेला म्हणजे २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जातो आणि २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि संविधानाचा महत्वाचा प्रसार करण्यासाठी 'संविधान दिन' साजरा केला जातो.



देशात सर्व जाती धर्माचे पंथाचे लोक बंधु भावाने राहतात याचे सर्व श्रेय भारतीय संविधानाला तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीच्या माध्यमातून जे संविधान बहाल केले त्यामध्ये स्वतंत्र, समता,बंधुता,न्याय या आधारावर हे संविधान देशाच्या सर्वोच्च ठिकाणी असून आज संविधानामुळे भारत देश जगामध्ये महासत्ता म्हणून पाहत आहे,म्हणून संविधानाचा आदर व सन्मान करणे हे सर्व भारतीयांचे कर्तव्य असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास के.डी.कांबळे, अतुल नागटिळक, प्रा.पवन थोरात, अरुण भालेराव, शाम धुरी, सुशील सरवदे, शिवराज पुल्लुर, विकास सरवदे, सुग्रीव जेटीथोर, किशोर इंगळे, आनंद जानराव, मल्लू शिवशरण, बापू सदाफुले, विजय ओहोळ, दत्ता कांबळे, जानाप्पा कांबळे, हणमंत वाघमारे, शितल कांबळे, महादेव बाबरे, समीर नदाफ, संघपाल घोडकुंबे, विकास चव्हाण आदी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# दि.२७ रोजी मोरे महाविद्यालयात संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील मविप्र समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य, विज्ञान, महाविद्यालयास सोनेवाडी येथील पीपीएफ एक्सपोर्ट कंपनीचे चेअरमन अमित कचेश्वर पडोळ यांनी दिलेल्या अठरा लाख रुपये देणगीतून महाविद्यालयात संगणक

**अमित पडोळ यांच्यातर्फे महाविद्यालयास अठरा लाखाची देणगी**

प्रयोगशाळा कक्षाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे उद्घाटन मविप्र चे सरचिटणीस ॲड नितीनजी ठाकरे यांचे शुभ हस्ते व सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता निफाड महाविद्यालयात होणार आहे. कर्मवीरांच्या विचारांचा वसा आणि वारसा जतन करीत समाजातील अनेक जण मविप्र समाजाच्या प्रगतीत योगदान देत आहेत, अशा समाजहित उपक्रमात लोकप्रिय असणारे निफाड तालुक्यातील सोनेवाडी येथील अमित कचेश्वर पडोळ यांचा मविप्र समाज व निफाड महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात येणार असून या वेळी म.वि.प्र.समाज चे सरचिटणीस ॲड नितीनजी ठाकरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला सदस्य शोभाताई बोरस्ते, यासह सर्व कार्यकारिणी, शिक्षणाधिकारी, महाविद्यालय व शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, निफाड पत्रकार संघ, निफाड वकील संघ, माजी विद्यार्थी संघ, परिसरातील सर्व सभासद हितचिंतक व मान्यवर उपस्थित राहणार आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव यांनी दिली व या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### पतीविरुद्ध तक्रार दिल्याने पत्नीला झोडपले

सोलापूर (प्रतिनिधी) तू सारखे पोलीस स्टेशनमध्ये माझ्याविरुद्ध तक्रार का देतेस असे म्हणून पतीने पत्नीला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून खाली पाडत तिच्या गळ्यावर पाय ठेवून तिला दाबून कानावर,गळल्यास मारहाण केल्याची फिर्याद अनिसा कुदरत कारभारी (वय-३३-,रा.आयोध्या नगरी,हैदराबाद रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून फिर्यादी यांचे पती कुदरत खाजाभाई कारभारी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास जेलरोड पोलीस ठाण्याच्या आवारात घडली.या घटनेचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्योत्सना भांबिष्टे हे करीत आहे.

### विवाहितेचा छळ ; पतीसह नऊ जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहिता या सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून त्यांना वेळोवेळी शिवीगाळ करत मारहाण केली.त्यानंतर जेवायला न देता शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक त्रास दिल्याची फिर्याद सलीमा जावेद रुस्तुम (वय-३९,रा.प्रभाकर नगर,मजरेवाडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना ३ मार्च २०२० ते २५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. सलीमा रुस्तुम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती जावेद, चुलत दीर रफिक,जाऊ फरजाना,भावजय साजिदा शेख,भावजयाची आई सायरा शेख,भाऊ भावजायचे वडील अब्दुल रजा शेख व त्यांची बहीण नुरजहा मुल्ला व भावजयाचा भाऊ फैयाज शेख,सिमरन तांबोळी (सर्व. रा.काजल नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### चाकोते नगरातून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) जुना विडी घरकुल येथील चाकोते नगर येथे हॅंडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीएस.८९९१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ नोव्हेंबर रोजी पाच ते आठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी श्रीकांत रामलू दयावरकोंडा (वय-३१,रा.चाकोते नगर,जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

# डॉ.आंबेडकर यांच्या संविधानात देशाची समता समानता एकात्मता आणि अंखडता अश्वासन देणारी बंधुता क्रमप्राप्त ठरली आहे : खारवे

## नळदुर्ग येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात करण्यात आले अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना खूप महत्त्व दिलेले आहेत स्वातंत्र्याचा व समतेचा हक्क शैक्षणिक आणि सांस्कृतिक हक्क देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे देशाची एकता एकात्मता समता समनता आणि अखंडता व जगातील सर्वात मोठे आणि महान असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास प्रत्येक घरात पोहोचवण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यायला हवा असे प्रतिपादन डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडियम स्कूलचे मुख्य प्रवर्तक संस्थापक मारुती खारवे यांनी केले





नळदुर्ग डॉ बाबासाहेब आंबेडकर इग्लीश मेडीयम स्कुल मध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला त्यावेळेस ते बोलत होते . प्रथमता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प पुजन आणि संविधानाची प्रास्ताविका वाचन करण्यात आले यावेळेस ते बोलत होते तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकामध्ये स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक संजय बताले यांच्या हस्ते संविधान फलकाचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले संविधानाच्या प्रतिमाचे ही पूजन करण्यात आले यावेळी बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे व अदिनाथ बागडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले यावेळी सोसायटीचे संचालक तथा भावी चेअरमन रघुनाथ नागणे , रिपाईचे नेते दुर्वास बनसोडे , रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे , भारतीय बौद्ध महासभेचे अदिनाथ बागडे , उमेश गायकवाड , योगेश सुरवसे , अजयकुमार बागडे , सोनु बनसोडे , रुषीकेश कांबळे , प्रमोद गायकवाड , अमोल कांबळे , तानाजी गायकवाड , अभिमन्यू राजगुरू , अमित बनसोडे , वैभव कांबळे , सचिन बनसोडे , धनू वाघमारे , आय्याप्पा भांगे , दिलीप भांगे , अशीष लोंढे , कुमार सुरवसे , शैलेश बनसोडे , अमित बनसोडे , संजय कांबळे , महेश वाघमारे , गौतम वाघमारे कार्तीक बनसोडे , पपू कांबळे , किशोर के बनसोडे , गोरख कांबळे , सुरज कांबळे , मिरा थोरात , माया कांबळे , सिमा लोंढे , सुजाता कांबळे , विद्यासागर कांबळे , सुभाष कांबळे , ओम गायकवाड , सुभाष नागिले , ज्योती बनसोडे मधुमती साखरे , साहील बनसोडे अतिश वाघमारे सह नागरिक बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते .

# हार कर भी जितने वाले को बाजिगर कहते है

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : कोणतेही राजकीय पाठबळ नसताना कार्यकर्त्यांनी दिवसाची रात्र करून कष्ट घेतले. खूप मोठी अपेक्षा होती. परिवर्तन विकास आघाडी १०० टक्के विजयी होईल, असा विश्वास होता. मात्र, हार जीत होत असते, लढलो हाच इतिहास आहे. 'हार कर भी जितनेवाले को बाजीगर कहते है।' जनतेने दिलेला कौल मान्य असून, यापुढे खचून न जाता अधिक जोमाने काम करून जनतेची सेवा केली जाईल, असा विश्वास परिवर्तन विकास आघाडीचे अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांनी व्यक्त केला.

विधानसभेचा निकाल लागल्यानंतर प्रवीण माने यांच्या निवासस्थानी उपस्थित कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. माने म्हणाले, हार-जीत होत असते. ज्यांनी मतदान दिले त्यांचे आभार मानतो. परिवर्तन विकास आघाडीच्या कोणत्याही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडले जाणार नाही. त्यांच्या मदतीला ठामपणे उभा राहणार. इंदापूर तालुक्याच्या विकासासाठी सदैव तत्पर राहून काम करेन. कोणी राजकारणात ताम्रपट घेऊन आलेल नसतं, खचून जाणार नाही.



### सर्वसामान्य जनतेच्या प्रेमापोटी अपक्ष लढलो

इंदापूर बाजार समितीचे माजी सभापती परिवर्तन विकास आघाडीचे नेते मयूरसिंह पाटील म्हणाले, तालुक्यात तिसरा पर्याय म्हणून नवखे असलेले प्रवीण माने यांनी आजी-माजी लोकप्रतिनिधींपुढे आव्हान उभे केले. आपल्या आघाडीकडे कोणताही पक्ष नव्हता, नेते नव्हते तरीदेखील चांगले मतदान किटली या चिन्हाला झाले. झालेल्या मतांची प्रेरणा घेऊन आघाडी पूर्ण ताकतीने काम करेल. प्रवीण माने हे उगवते व्यक्तिमत्त्व ठरले असून, तालुक्यातील नवीन इतिहासाचे पान त्यांनी लिहिले आहे. मतदारांनी अल्पकाळात उत्तम प्रतिसाद दिला. यापुढे जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच सर्व निवडणुका परिवर्तन विकास आघाडी सोनाई उद्योग समूहाचे अध्यक्ष दशरथ माने यांच्या मार्गदर्शनाखाली लढण्यासाठी कटिबद्ध राहील.

बाबासाहेब चवरे म्हणाले, तालुक्यात जातीपातीचे राजकारण करू नये. तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र आलेल्या परिवर्तन विकास आघाडीला जनतेने प्रवीण माने यांना पाठिंबा दिला. नवीन पिढीने जातीमुक्त राजकारणात सहभाग घ्यावा.

# गोगांव ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळेत संविधान दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : ग्राम पंचायत गोगांव ता. अक्कलकोट येथे संविधान दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रम अध्यक्षस्थानी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे हे होते प्रतिमा पूजन वकल्लपा बनसोडे व लक्ष्मण गायकवाड यांचे हस्ते करण्यात आले यावेळी आकाश गायकवाड, प्रदीप जगताप, नितीन गायकवाड, शांतकुमार बनसोडे , विशाल बनसोडे यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संविधान प्रास्ताविक वाचण्यात आले

जिल्हा परिषद शाळा येथे संविधान दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप, सूर्यकांत जीरगे, पुंडलिक वाघमारे, ज्योती आलूरे, किरण गायकवाड, परमेश्वर गायकवाड उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय संविधान प्रतिमेचे पूजन वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राजेंद्रसिंह लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे व सेमी विभागाचे दिगंबर जगताप हे उपस्थित होते.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या घटनेमुळे भारतीय लोकशाही आजही मजबूत आहे. संविधानाने लोकांना समान न्याय, हक्क व अधिकार दिलेला आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाने संविधान स्वीकारले, तेव्हापासून २६ नोव्हेंबर हा दिवस देशात सर्वत्र संविधान दिन आणि राष्ट्रीय कायदा दिवस म्हणून साजरा केला जातो.

यानिमित्त देशभरातील शाळांमध्ये विविध कार्यक्रम घेतले जातात भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा विविध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण केली जाते. हे संविधान भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून घोषित करते. भारताची राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. संविधानाची मूल्ये, तत्वे, हक्क व अधिकार याविषयी विद्यार्थ्यांना यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी मार्गदर्शन केले

यानंतर संविधानावर आधारित इ ७ वी तील कुमारी अतूफा कारंजे व सेमी विभागाची ऋत्विक मुसळे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. यावेळी विद्यार्थ्यांकडून संविधानाचे वाचन करून घेतले तसेच निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आले. या विविध स्पर्धेत शाळेतील ६८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



उपक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी, पूजा कडबगावकर, शरणबसप्पा चानकोटे, श्रीदेवी मायनाळे, राजकुमार गवळी, सिद्रामप्पा पाटील, मनीषा दूधभाते आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## शहाजी प्रशालेत माजी विद्यार्थ्यांकडून पावणे चार लाख रूपयाचा ८ किलो व्हॅंट सौर यंत्रणा कार्यान्वित

## विलासराव देशमुख यांचे प्रतिपादन

# कृतीतून कृतज्ञता व्यक्त करा, हाच संदेश अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : एक सुसंस्कृत नागरिक म्हणुन जगात यशस्वी होण्यासाठी शाळेची भुमिका खुप महत्वाची असते. शाळा आपणाला आईवडिल, पालक, शिक्षक, संस्था समाज याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी देत असते. आपण जगात वावरत असताना आपल्या कृतीतुन कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. हाच संदेश अक्कलकोट च्या स्वामी समर्थांचाही आहे. तोच तुम्ही पाळा आणि आई, वडिल, शाळा हे चांगल्या संस्कारासाठी मार्गदर्शन करतात आणि या सर्वाप्रती कृतज्ञता बाळगा असे आवाहन मराठा मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख यांनी केले.

येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत मंगळवारी २६ नोव्हेंबर रोजी १९६६ बॅंचचे माजी विद्यार्थी अमेरिका स्थित विलास राजपालराव जाधव यांच्या देणगीतुन सुमारे पावणे चारलाख रूपयाचा ८ किलो व्हॅंट सौर यंत्रणा उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून विलासराव देशमुख बोलत होते. यावेळी उद्घाटक म्हणून मराठा मंदिर संस्थेचे सरचिटणीस दीपक देशमुख, मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, १९६६ बॅंचचे प्रतिनिधी डॉं.मनोहर मोरे, सौर यंत्रणा तंत्रज्ञ सतीश शिंदे, निमंत्रित बी.व्ही.निंबाळकर,



मुख्याध्यापक एस. एन.शिंदे, उपमुख्याध्यापक एस.व्ही.भांगरे, पर्यवेक्षक आर.एस.पडवळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना मराठा मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख म्हणाले, शिक्षण हे विद्यार्थीचे भविष्य आहे. शिक्षण क्षेत्रात नवनवीन आव्हाने लक्षात घेऊन संस्था नियोजन करत असते. यासाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी संस्था, शिक्षक, पालक मेहनत घेत असतात. समाज माध्यमांच्या या जगात ज्ञानाचा प्रसार झाला आहे. रोबोटिक्स व एआय च्या जमान्यात एक मिनिटाला जवळपास साडेतीन कोटी संदेश समाजमाध्यमावर पाठविले जातात.

प्रारंभी संविधान प्रत, २६/११ तील शहिद व श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत व प्रास्तविक उपमुख्याध्यापक एस.व्ही.भागरे यांनी केले. यावेळी प्रशालेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉं.मनोहर मोरे म्हणाले या प्रशालेच्या प्रांगणातच आम्ही शिक्षण घेतले. खेळलो,भांडलो,बागडलो. आमच्या १९६६ च्या बॅंचच्या वतीने आम्ही प्रशालेला सौर यंत्रणा भेट देणार होतो. पण आमचे वर्गमित्र अमेरिकास्थित विलास जाधव यांनी एकट्याने ही मदत दिली. भविष्यात ही आम्ही सदैव मदत करु असे सांगितले.

विद्यावर्धिनी अध्यक्ष योगेश पवार यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले तुम्ही मोठे झाला की संस्था आपोआप मोठी होईल. एकेकाळी रॉंकेलच्या दिव्याच्या प्रकाशाखाली अभ्यास करणारा विद्यार्थी आज अमेरिकेत आहे हे संस्थेसाठी अभिमानाची गोष्ट आहे.तुम्ही अशा लोकांचा आदर्श घ्या. हा सौर प्रकल्प विद्यार्थीसाठी एक प्रात्यक्षिक शिक्षणाचे स्त्रोत आहे. कशी सौर उर्जा बनते त्याची माहिति विद्यार्थ्यांना देता येईल. ज्या पद्धतीने रत्नागिरी येथे एआय कार्यशाळा घेतली होती तसे येथेही घेऊ असे सांगितले. सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुग वाय. पी. कबाडे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक आर. एस.पडवळकर यांनी केले.

**अमेरिकास्थित १९६६ बॅंचचे माजी विद्यार्थी अमेरिकास्थित विलास राजपालराव जाधव यांच्या देणगीतुन सुमारे पावणे चारलाख रूपयाचा ८ किलो व्हॅंट सौर यंत्रणा कार्यान्वित केले.**